**शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणा-या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (Joint Entrance Examination) आधारे करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्रशिक्षण विभाग**
शासन निर्णय क्र:संकीर्ण-२०११/प्र.क्र.३३७/तांशि-४
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई — ४०० ०३२
दिनांक : ३१ ऑक्टोबर २०१२

वाचा :-
1) उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांचे पत्र क्र. एफ.५-१/२०११-पीएन.१, दि. २७.०२.२०१२
2) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/२०११/३३६, दि. १३.०३.२०१२
3) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र २अ/एडीएम/२०१२/४५९, दि. ०७.०४.२०१२
4) शासन पत्र, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, क्र. संकीर्ण २०११/प्र.क्र.३३७(अ)/तांशि-४,, दि. ०२.०५.२०१२
5) उच्च शिक्षण विभाग, मनुष्यबळ विकास मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची अधिसूचना क्र. एफ.२१-६/२०१२-टीएस.१, दि. १४.०८.२०१२

**प्रस्तावना** :- भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने प्रथम वर्ष अभियांत्रिकी प्रवेशासाठी केंद्रीय स्तरावर संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) घेण्याचे निश्चित केले आहे. केंद्र शासनाने शैक्षणिक वर्ष २०१३-१४ पासून देशातील सर्व IIT तसेच केंद्र शासन अर्थसहाय्यित शैक्षणिक संस्थांमध्ये अभियांत्रिकी प्रथम वर्ष अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) मार्फत करण्याचे ठरविले आहे.

राज्यात वैद्यकीय, अभियांत्रिकी व औषधनिर्माण शास्त्र या व्यावसायिक अभ्यासक्रमाचे प्रवेश सन २००४-०५ पासून MHT-CET या प्रवेश परीक्षेद्वारे करण्यात येत आहेत. ही प्रवेश पध्दती राज्यात २०१२-१३ पर्यंत सुरु आहे. सदर प्रवेश परीक्षेत पात्र विद्यार्थ्यांचे प्रवेश CAP मार्फत गुणवत्तेनुसार करण्यात येतात.

सद्य:स्थितीत राज्यामध्ये राज्य पातळीवर घेण्यात येणा-या एमएचटी-सीईटी या परीक्षेमध्ये विद्यार्थ्यांने संपादन केलेल्या गुणवत्तेनुसार अभियांत्रिकी प्रथम वर्ष पदवी अभ्यासक्रमाची प्रवेशप्रक्रिया राबविण्यात येते. केंद्र शासनाने देशातील घटक राज्यांना सूचित केले आहे की घटक राज्यांनी त्यांच्या अखत्यारीतील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेश संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (JEE) आधारे करावेत किंवा राज्य शासनास आवश्यक वाटल्यास सद्याची पध्दत कायम ठेऊन प्रवेशप्रक्रिया राबविण्याची मुभा राज्य शासनास आहे. सदर संयुक्त प्रवेश परीक्षेमुळे संपूर्ण देशभरात अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी समान धोरण अनुसरले जाणार असल्याने निकोप स्पर्धेद्वारे विद्यार्थ्यांना संबंधित संस्थांमध्ये प्रवेश मिळणे सुलभ होणार आहे. आतापर्यंत राज्यातील विद्यार्थ्यांना IIT-JEE/AIEEE/राज्य शासनाची CET इत्यादी वेगवेगळ्या

परीक्षा द्याव्या लागत होत्या, आता केंद्र शासनाने संपूर्ण देशात JEE ही एकच परीक्षा घ्यावयाची ठरविल्यामुळे विद्यार्थ्यांना एकच परीक्षा द्यावी लागणार असून त्यामुळे विद्यार्थ्यांचा वेळ, पैसा आणि श्रम याची बचत होणार आहे. या संदर्भात नेमलेल्या अभ्यासगटाच्या शिफारशी लक्षात घेऊन आणि केंद्र शासनाच्या सूचना विचारात घेऊन या प्रवेश प्रक्रियेत राज्य शासनाने सहभागी होण्याचा निर्णय दिनांक १२.०९.२०१२ रोजी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला. त्यानुसार आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने संपूर्ण देशात प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी प्रवेशासाठी केंद्रीय स्तरावर संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) घेण्याचे निश्चित केले आहे. या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास शासनाची मान्यता देण्यात येत आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून राज्यातील प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणा-या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (Joint Entrance Exam) आधारे करण्यास मान्यता देण्यात येत आहे. या प्रवेशपध्दतीची अंमलबजावणी करताना खालील प्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

१) शैक्षणिक वर्ष २०१४-१५ पासून महाराष्ट्रातील संस्थांमधील प्रथम वर्ष अभियांत्रिकी अभ्यासक्रमाचे प्रवेश हे राष्ट्रीय पातळीवरील संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE) आणि इयत्ता बारावी मध्ये विद्यार्थ्यांनी संपादित केलेले गुण यांच्या आधारे करण्यात यावेत.

२) राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येणाऱ्या संयुक्त प्रवेश परीक्षेच्या मुख्य (main) भागातील गुणांना ५० टक्के महत्तमाप (weightage) आणि इयत्ता बारावीमध्ये विद्यार्थ्याने संपादित केलेल्या गुणांना ५० टक्के महत्तमाप देण्यात यावे. तदनंतर दोन्ही परीक्षांतील प्राप्त गुणांनुसार अंतिम गुणवत्ता यादी तयार करण्यात यावी.

३) राज्यातील विविध परीक्षा मंडळातील (CBSE/ICSE/राज्य मंडळ इत्यादी) .विद्यार्थ्यांची इयत्ता १२ वीच्या गुणांचे मुल्यांकन इंडियन स्टॅटिस्टिकल इन्स्टिटयूटने ठरविलेल्या नॉर्मलाईज पर्सेंटाईल पद्धतीनुसार करण्यात यावे.

४) राष्ट्रीय पातळीवरील JEE परीक्षेचे मुख्य (main) आणि प्रगत (advance) असे दोन भाग असून त्यातील मुख्य भागामध्ये (main part) संपादित केलेल्या गुणांच्या आधारेच राज्यातील सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांच्या पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया करण्यात याव्यात. तथापि, JEE परीक्षेचे प्रगत (advance) भागातील गुण प्रवेशाच्यावेळी विचारात घेण्यात येऊ नयेत.

५) इयत्ता बारावीमध्ये संपादित केलेल्या गुणांपैकी ५० टक्के गुणांचे महत्तमाप ठरविताना, विद्यार्थ्याने केवळ फिजीक्स, केमिस्ट्री आणि मॅथेमेटीक्स (पीसीएम) या विषयांमध्ये संपादित केलेल्या गुणांचाच विचार करण्यात यावा.

६) इयत्ता १२ वीच्या परीक्षेत फिजीक्स, केमिस्ट्री आणि मॅथेमॅटीक्स (पीसीएम) या विषयांमध्ये एकत्रित किमान ५० टक्के गुण प्राप्त करणे अनिवार्य राहील. (म्हणजेच अभियांत्रिकी प्रवेशासाठी इयत्ता १२ वी मध्ये फिजीक्स, केमिस्ट्री आणि मॅथेमॅटीक्स (पीसीएम) या विषयांत एकत्रित ५० टक्क्यापेक्षा कमी गुण असलेले विद्यार्थी पात्र ठरणार नाहीत.)

७) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदर बाबीस सर्व प्रसिध्दी माध्यमाद्वारे (इलेक्ट्रॉनिक्स व प्रिंट) व्यापक प्रसिद्धी द्यावी.

८) राष्ट्रीय पातळीवरील आयोजित संयुक्त प्रवेश परीक्षेच्या (JEE) दर्जानुरुप इयत्ता बारावीचा अभ्यासक्रम सुधारित करण्यात यावा.

२.	राज्यातील उपरोक्त अभियांत्रिकी प्रथम वर्ष प्रवेशासाठी संयुक्त प्रवेश परीक्षा (JEE)पध्दत सन २०१४-१५ या शैक्षणिक वर्षापासून राबविण्यात येणार आहे. राज्यात या प्रवेश पध्दतीची अंमलबजावणी करण्यासाठी सक्षम प्राधिकारी आणि नोडल ऑफीसर म्हणून संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना घोषित करण्यात येत आहे. या प्रवेश परीक्षा पध्दतीचे आयोजन करण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांनी तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत निर्माण करावी. तसेच सदरहू संयुक्त प्रवेश परीक्षा ही केंद्रीय पातळीवरुन आयोजित करण्यात येत असली तरी राज्यात या प्रवेश परीक्षा पध्दतीचे नियोजन, संनियंत्रण, केंद्राच्या इतर संबंधित प्राधिकरणांशी संपर्क, परीक्षेचे निकाल, विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन इत्यादी जबाबदा-या संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या राहतील. या प्रयोजनासाठी संचालनालयामध्ये स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात यावा. संचालक, तंत्र शिक्षण यांनी सर्व जिल्हाधिका-यांशी संपर्क साधून त्यांना देखील सविस्तर सूचना द्याव्यात.

हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक २०१२१०३११५३१०३४६०८ असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

(म. मा. मोरे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा. राज्यपालांचे सचिव
मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
अतिरिक्त मुख्य सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, आदिवासी विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई
संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई (५ प्रती)
संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र राज्य, मुंबई
सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालये (सर्व)
आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
आयुक्त,आदिवासी विकास, महाराष्ट्र राज्य, नाशिक
संचालक, माध्यमिक व उच्च् माध्यमिक शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे
अध्यक्ष, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, राज्य मंडळ, पुणे
कुलगुरु, सर्व विद्यापीठे
प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त कार्यालय, १ला मजला, नवीन प्रशासन भवन, मादाम कामा रोड, मुंबई — ४०००३२ (पत्राने)
मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
मा. राज्यमंत्री, उच्च व तंत्र शिक्षण यांचे स्वीय सहायक
मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक
प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांचे स्वीय सहायक
उच्च व तंत्र शिक्षण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
महासंचालक, माहिती व जनसंपर्क, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती/तांशि-४

k:\jee-cet-g.r.11.10.12.doc